**गोपनीय**

क्रमांक : का.स./बैठक/२३४

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २२ ऑगस्ट, २०१२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

प्रकि 22-8-2012
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री.द.म.सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री.एन्.व्ही.मिराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ.शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव, (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**
विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३४वी बैठक

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | १० जुलै, २०१२ (मंगळवार) |
| **वेळ** | : | दुपारी ३.०० वाजता |
| **स्थळ** | : | मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>२ रा मजला, नविन प्रशासकीय इमारत,<br>मंत्रालय समोर,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जयंत कुमार बांठीया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी | - | सदस्य |
| श्री.गौतम चॅटर्जी<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री.सिताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.तानाजी सत्रे<br>व्यवस्थापकीय संचालक (अति.कार्यभार),<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. राहुल अस्थाना<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.एस.व्ही.आर.श्रीनिवास
अति.महानगर आयुक्त (१)/ प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

...२/-

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सुनिल पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श.म.सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.ग.पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : <u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ जानेवारी, २०१२ व दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या अनुक्रमे २३३व्या व तहकूब २३३व्या बैठकींची कार्यवृत्ते कायम करणे.</u>**

कार्यवृत्ते कायम करण्यात आली.

**बाब क्र.२ : <u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ जानेवारी, २०१२ व दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या अनुक्रमे २३३व्या व तहकूब २३३व्या बैठकींच्या कार्यवृत्तांवरील कार्यवाही अहवाल.</u>**

२.१ प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ४ जानेवारी, २०१२ व दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या अनुक्रमे २३३व्या व तहकूब २३३व्या बैठकींच्या कार्यवृत्तांवरील कार्यवाही अहवालावर चर्चा करताना त्यामधील <u>बाब क्र.२ - प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २ ऑगस्ट, २०११ रोजी झालेल्या २३२व्या बैठकीच्या कार्यवृत्तामधील कार्यवाही अहवालामधील</u> सूचना क्र.१ बाबत प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विविध कामांचे सुधारित अंदाजपत्रक किंवा झालेला अतिरिक्त खर्च आणि भविष्यात होणारा अपेक्षित खर्च इत्यादी बाबींची माहिती संबधितांच्या लक्षात आल्यानंतर त्वरित प्राधिकरणास कळविण्यात यावे, या आशयाचे परिपत्रक प्राधिकरणाने निर्गमित करावे असे निर्देश कार्यकारी समितीने बैठकीत दिले होते. या अनुषंगाने परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे अशी माहिती समितीस देण्यात आली. तसेच कार्यकारी समितीच्या २३२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांमधील कार्यवाही अहवालामधील सूचना क्र.३,४ व ५ या स्कायवॉकसंबंधी विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी स्कायवॉकवर जाहिरात लावून उत्पन्न मिळविण्यासंबधीची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असल्याचे नमूद केले. त्यावर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनीही निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासंबधी अपेक्षा व्यक्त केली. त्यावर महानगर आयुक्त यांनी या निविदेस अदयाप सुयोग्य असा प्रतिसाद मिळाला नसल्याचे व त्यामुळे निविदा विक्री तसेच निविदा प्राप्तीच्या दिनांकात वाढ केली असल्याचे नमूद केले. मा.मुख्य सचिव व अध्यक्ष यांनी याबाबत त्वरेने कार्यवाही करावी अशा सूचना केल्या.

२.२ प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी स्कायवॉकच्या सादरीकरणाबाबत विचारणा केली की, पुढील बैठकीत सविस्तर सादरीकरण करण्यात येईल असे कार्यवाही अहवालात नमूद केले आहे तेव्हा सादरीकरण केव्हां करणार? यावर अति.महानगर आयुक्त (२) यांनी स्कायवॉकबाबत

सविस्तर माहिती दिली व कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सविस्तर सादरीकरण करण्यात येईल असे सांगितले.

२.३ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, स्कायवॉकबाबत सविस्तर सादरीकरण करावे व स्कायवॉकचा उपयोग किती पादचारी करतात? याची अद्ययावत माहिती कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावी.

२.४ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे मत व्यक्त केले की, आजपावेतो स्कायवॉकसाठी स्वयंचलित जिने बसविण्यात आलेले नाहीत. त्यावर प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांनी असे सांगीतले की, स्कायवॉकसाठी स्वयंचलित जिने बसविण्यात आलेले नसून मोनोरेल येथे स्वयंचलित जिने बसविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

२.५ मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने बांधलेल्या स्कायवॉकचा उपयोग पादचा-यांसाठी मोठया प्रमाणात करावा याबाबतचे धोरण ठरविण्याबाबत सह-पोलिस आयुक्त (वाहतुक) यांना विनंतीपत्र पाठविण्यात आले आहे. याबाबत मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सह-पोलिस आयुक्त (वाहतुक) यांना आमंत्रित करण्यात यावे.

२.६ त्यानंतर <u>सुचना क्र.६ - इनोव्हेशन पार्क</u> - बाबत चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, इनोव्हेशन पार्क विकसित करण्याबाबत आजपावेतो कुठलीही प्रगती झालेली नाही. तसेच सदर प्रकल्प हा कार्यान्वितसुध्दा झालेला नाही. त्यामुळे कार्यकारी समितीने असे ठरविले की, सध्या हा प्रकल्प रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी. त्यानुसार कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

२.७ त्यानंतर <u>बाब क्र.१४ - महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. यांना ठेव देण्याबाबत -</u>

या विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, कार्यकारी समितीच्या मंजूरीनुसार दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी रु.८३ कोटीची ठेव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आलेली आहे. सदरहू ठेवीची मुदत समाप्तीनंतर पुढील ९० दिवसांसाठी नुतनीकरण करण्याकरीता कंपनीने विनंती केलेली आहे. कार्यकारी समितीने मंजूर

केल्याप्रमाणे ठेवीच्या नुतनीकरणाच्या अटी व शर्ती कंपनीस कळविण्यात आलेल्या आहेत. तसेच सदरहू ठेवीच्या सुरक्षिततेकरीता एस्क्रो अकाऊंट/वित्तीय मत्तेद्वारा सुरक्षितता इत्यादी कार्यप्रणालीबाबतही कळविण्यात आले आहे. तथापि, कंपनीने प्राधिकरणाच्या अटी व शर्ती मान्य केलेल्या नाहीत.

२.८ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मे. सी.एम.एस. ट्राफिक सिस्टम लि. यांचेकडून दोन सुवाहय स्वयंचलित वाहतूक मोजणी व वाहन वर्गीकरण यंत्र (Portable TIRTL) एकमेवस्त्रोत आधारावर (Sole Source Basis) खरेदीकरिता कार्योत्तर मंजुरी मिळण्याबाबत.**

३.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भविष्यातील परिवहन योजनांसाठी व वाहतूक व्यवस्थापनेसाठी सुसंगत वाहन गणना व वर्गीकरण असणे महत्वाचे आहे. याकरिता मानवी पध्दतीने व व्हिडीओ चित्रफित या पध्दती उपलब्ध आहेत. या पध्दतीत २०-२५ गणक, ६-८ व्हिडीयो कॅमेरे तसेच मोजणी झाल्यानंतर वाहतूकीच्या माहितीचे विश्लेषण करुन वाहतूक मोजणीचे योग्य आकलन करण्यासाठी संपूर्ण एक आठवडयाचा कालावधी लागतो व या कामामध्ये भरपूर मनुष्यबळ, वेळ व खर्च लागतो तसेच मानवी चूका होण्याची शक्यता असते. हे कार्य स्वयंचलीत वाहतूक मोजणी यंत्रणा प्रणालीद्वारे सुध्दा करता येते, परंतू हया प्रणालीद्वारे एकाच स्थळाची वार्षिक वाहतूक मोजणी केली जात असल्याने संपूर्ण शहरातील वाहतूक मोजणीची माहिती घेणे शक्य होत नाही. याकारणामुळे नवीन परिवहन व वाहतूक प्रकल्पांचे नियोजन करताना वार्षिक वाहतूक मोजणी अहवालावर अवलंबून राहावे लागते व ते ब-याच वेळेस सद्य:स्थितीशी असंगत असते.

३.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे मेसर्स सी. एम. एस. (CMS) ट्राफीक लि. (मेसर्स सी. ई. ओ. एस. (CEOS) ऑस्ट्रेलिया यांचे अधिकृत वितरक) यांनी सुवाहय स्वयंचलीत वाहतूक मोजणी व वाहन वर्गीकरण यंत्राची (Portable TIRTL) माहिती व उपयुक्तता व त्याबाबतचा प्रस्ताव सादर केला. या यंत्राचे विशेष अधिकार स्वयंरक्षित (Patented) असून मेसर्स सी.ई.ओ.एस. (CEOS, Australia) यांचेकडे आहे. सदर यंत्राचा दुसरा समांतर पर्याय

उपलब्ध नाही. हे यंत्र जी.एस.एम./३-जी, (GSM 3G) द्वारे कार्यान्वीत करता येते. सदर सुवाहय स्वयंचलीत वाहतूक मोजणी यंत्राची रस्त्याच्या दोन्ही बाजूस उभारणी करण्यात येते. यंत्रामधील प्रसारीत उपकरणाद्वारे अतिनील किरणे (Infrared rays) प्रसारीत केली जातात, ही किरणे रस्त्याच्या विरुध्द बाजूस असलेल्या सवक उपकरणाद्वारे संग्रहीत केली जातात. अशा प्रकारे एकाच वेळेस दहा मार्गिकिवरील (पथावरील) वाहतूक गणना, वर्गीकरण व वेग या माहितीचे विश्लेषण करणे शक्य होते. मेसर्स सी.ई.ओ.एस. (CEOS) यांनी भारतीय वाहतूक व्यवस्थेस अनुसरुन यात योग्य ते बदल करुन ही प्रणाली विकसित केली आहे. त्यामुळे ९९% अचूक वाहतूक मोजणी व ९७% अचूक वाहनाचे वर्गीकरण करणे शक्य होते.

३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, परिवहन व दळणवळण विभागाद्वारे मुंबई महानगर क्षेत्रातील वार्षिक वाहतूकीची माहिती संकलीत व प्रकाशित केली जाते. ही वाहतूक माहिती नियोजन व प्रकल्प आरेखनासाठी उपयुक्त ठरते व ब-याच वेळेस विविध संस्था/विभागाकडून वाहतूक आणि परिवहन संबंधी निर्णय घेण्यासाठी विशिष्ट स्थळावरील वाहतूक गणना, वर्गीकरण आणि वाहतूक वेग याची मागणी केली जाते. अशा वेळेस प्राधिकरणाकडे सद्य:स्थितीतील सुसंगत वाहतूक वर्गीकरण उपलब्ध असल्यास ते मुंबई शहर, उपनगर आणि मुंबई महानगर क्षेत्राच्या वाहतूक नियंत्रक वा वाहतूक व्यवस्थापनेसाठी उपयुक्त ठरु शकेल.

३.४ मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व प्रवेश व निकष स्थळावर सदर सुवाहय स्वयंचलित वाहतूक मोजणी यंत्र (Portable TIRTL) वर्षातून दोनदा ठेवल्यास त्याद्वारे मिळणारी वाहतूक माहिती संग्रहीत करता येईल, ही वाहतूक व दळणवळणासंबंधी मुलभूत माहिती मुंबई महानगर क्षेत्रामधील विविध संस्था/विभागास वाहतूक नियोजन व व्यवस्थापनेस उपलब्ध होईल. सुसंगत वाहतूक गणना आणि वर्गीकरण टोल नाक्यावरील महसूलाची उलट तपासणी करण्यासाठी उपयुक्त होऊ शकेल. तसेच ही माहिती सार्वजनिक-खाजगी-भागीदारी आणि "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" यामधील निविदाकारासाठी सुध्दा उपयुक्त होऊ शकते. या यंत्राद्वारे ९९% अचूकतेने वाहतूक गणना व ९७% अचूकतेने वाहतूक वर्गीकरणाची केलेली माहितीसंग्रह नियोजक व अभियंत्यांना मिळू शकते. भारतीय संशोधक संस्था जसे, सि.आर.आर.आय. (CRRI), आय.आय.टी. (IIT), एन.आय.टी. (NIT) व खाजगी सल्लागार (L&T Sowil) या संस्थांनी भारतीय वातावरणास अनुकूल असलेली यंत्रणा वापरण्यास सुरुवात केली आहे. तसेच भारतीय परिस्थितीस स्वयंचलित वाहतूक मोजणी

...७/-

यंत्र (Portable TIRTL) अनुकूल असल्याची शिफारस केली आहे. या यंत्राचे सर्व विशेष अधिकार स्वयंरक्षित (Patented) असून दुसरा समांतर पर्याय भारतात उपलब्ध नसल्यामुळे सदर यंत्र एकमेव स्त्रोत (Sole Source Basis) आधारावर तत्त्वतः मान्यतेनंतर खरेदी करण्यात आले आहे. सदर सुवाहय स्वयंचलित वाहतूक मोजणी यंत्र (Portable TIRTL) हे मेसर्स सी.एम.एस. (CMS) ट्राफिक सिस्टीम लि. यांनी प्राधिकरणास सुपूर्द केले असून, त्याची प्रात्यक्षिक चाचणी दिनांक ५ डिसेंबर, २०११ रोजी घेण्यात आली व ती दोन यंत्रे व्यवस्थितपणे काम करीत आहेत.

३.५ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की ही वाहतूक मोजणी यंत्रणा महानगर प्रदेशात विविध संस्थांकरिता अत्यंत उपयुक्त ठरेल आणि या यंत्रणेव्दारे करण्यात येणारी मोजणी माहिती (Data) महानगरपालिका तसेच इतर संस्थांना उपलब्ध करुन द्यावी. त्याचप्रमाणे जेव्हा वाहतूक असेल त्यावेळी सदर यंत्रणा महानगरपालिकेससुध्दा उपलब्ध करुन द्यावी.

३.६ श्री.एन.व्ही.मिराणी सदस्य, कार्यकारी समिती यांनी ही यंत्रणा विशेष स्वयंरक्षित (Patented) असून वाहतुकीस दुसरा समांतर पर्याय उपलब्ध नसल्यामुळे या यंत्रणेची किंमत वाजवी आहे किंवा कसे? याबद्दल विचारणा केली. यावर प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी माहिती देताना असे सांगितले की, सदर यंत्रणा सि.आर.आर.आय., आय.आय.टी., एन.आय.टी., आणि दिल्लीच्या इतर संस्था या यंत्रणेचा वापर करीत असून या संस्थांकडून यंत्रणेच्या दराची माहिती मौखिकरित्या उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. तसेच व्हॅट आणि जकात कर वगळून संस्थेने प्राधिकरणाला दिलेले दर वाजवी आहेत. यावर मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, सदर बाबत लेखी माहिती मागवून घ्यावी आणि नोंद ठेवावी.

३.७ तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.११९९ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुंबई महानगर प्रदेशातील नियमित

वाहतूक मोजणी व वर्गीकरण करण्याकरीता आणि एकमेव स्त्रोत आधारावर (Sole Source Basis) निविदा स्विकारण्याकरीता दोन सुवाहय स्वयंचलित वाहतूक मोजणी व वाहन वर्गीकरण यंत्र (Portable TIRTL) मेसर्स सी.एम.एस.(CMS) ट्राफिक सिस्टीम लि. यांच्याकडून रु.३०,७०,२००/- इतकी मूळ किंमत त्यावर ५% व्हॅट कर व त्यावर ५.५% (व्हॅट + शुल्कासहीत) जकात कर लावून एकूण रु.३४,०१,०२४/- इतक्या किंमतीला खरेदी करण्याकरिता कार्योतर मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात** येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मोनोरेलला मध्य रेल्वेच्या वडाळा व करीरोड येथील रुळ ओलांडण्यासाठी बांधण्यात येणा-या पुलाच्या पर्यवेक्षणाचे काम करण्याकरीता मे. राईटस् यांची नियुक्ती करणेबाबत......**

४.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५ व्या बैठकीत ठराव क्र. ११९० अन्वये २० कि.मी. लांबीच्या संत गाडगे महाराज चौक-वडाळा-चेंबूर मार्गिकेवर मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी मे. लार्सन ॲन्ड टुब्रो, इंडीया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बी.एच.डी. मलेशिया समुहाची कंत्राटदार म्हणून रु.२,४६० कोटी (कर वगळून) या रक्कमेवर नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात आलेली असून मोनोरेल प्रकल्पाच्या कामास दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ रोजी सुरुवात झालेली आहे.

४.२ सदर प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. सुधारित वेळापत्रकानुसार टप्पा-१ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत प्रवाशांसाठी खुला होणे अपेक्षित असून टप्पा-२ नोव्हेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

४.३ टप्पा-२ - वडाळा ते संत गाडगे महाराज चौक ही मोनोरेल मार्गिका मध्य रेल्वेच्या वडाळा व करीरोड येथील रुळ ओलांडून जाते. सदर रुळ ओलांडण्यासाठी मध्य रेल्वेकडून परवानगी घेण्यात आली असून दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी मध्य रेल्वेबरोबर करारनामा करण्यात

...९/-

आला आहे. सदर मध्य रेल्वेचे रुळ ओलांडण्यासाठी लोखंडी गर्डरचा उपयोग केला जाणार असून वडाळा येथे अंदाजे ४० मीटरचा स्पॅन (Span) आणि करीरोड येथे ५० मीटरचा स्पॅन (Span) घेण्यात येणार आहे.

४.४ वडाळा येथील रुळ ओलांडण्यासाठी आराखडा, नकाशे आणि उभारणी योजना मध्य रेल्वेने मंजूर केल्या आहेत व त्या अनुषंगाने मध्य रेल्वेने सदर प्रस्ताव रेल्वे सुरक्षा आयुक्त यांच्याकडे पाठविला आहे. वडाळा स्थानकाजवळ चाचणी पाईल पूर्ण केली असून पाया बांधकामाचे काम लवकरच सुरु करण्यात येईल. तसेच करीरोड येथील रुळ ओलांडण्यासाठी आराखडा, नकाशे आणि उभारणी योजना मध्य रेल्वेला सादर केल्या असून मध्य रेल्वेमार्फत त्यावर पुनर्विलोकन (Review) करण्यात येत आहे.

४.५ मध्य रेल्वेबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार, रेल्वे रुळ ओलांडणा-या पूलाचे पर्यवेक्षण करण्यासाठी सल्लागार म्हणून राईटस्, इरकॉन या रेल्वे अंगीकृत संस्थांची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने मे. राईटस् यांना पर्यवेक्षण सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचे प्रस्तावित असून मे. राईटस् यांनी प्राधिकरणामार्फत मिलन ROB साठी यापूर्वी काम केलेले असून एम. एम. ओ. पी. एल. या संस्थेमार्फत अंधेरी येथील मेट्रो रेल्वेच्या पूलासाठी काम करीत आहे.

४.६ वरील बाबींचा विचार करता राईटस् या संस्थेकडून वडाळा व करीरोड येथील मध्य रेल्वेचे रुळ ओलांडण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आला होता. मे. राईटस् या संस्थेने प्राधिकरण आणि एम.एम.ओ.पी.एल. यांची कामे ज्या अटी व शर्तीवर केली होती त्याच अटी व शर्ती सदर कामासाठी लागू कराव्यात अशा प्रकारचा कार्यविस्ताराचा प्रस्ताव देण्यात आला. तद्नंतर, मे. राईटस् यांनी दिनांक १० एप्रिल, २०१२ रोजी प्रस्ताव प्राधिकरणास सादर केला असून त्यांनी रुपये ७.५० लाख प्रती महिना (सेवाकर वगळून) अशी फी आकारली आहे.

४.७ सदर विषयावर बोलताना श्री. एन.व्ही. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मोनोरेल पुलाचे काम बारा महिन्यात पूर्ण होणार का? या विषयावर बोलताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मोनोरेल उभारणी करण्याच्या (launching) कामाकरीता रेल्वेची वेळोवेळी परवानगी घेण्यास तसेच Traffic Blocks यांच्यावर अवलंबून असून सदर काम १२ महिन्यात पूर्ण होणार की नाही हे सध्या सांगता येत नाही. परंतु १२ महिन्याच्या

कालावधीनंतर मे. राईटस् या सल्लागाराबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार सल्लागाराला उर्वरित काम पूर्ण होईपर्यंत काम चालू ठेवावे लागेल. तसेच सदर काम रु.७.५० लाख प्रति महिना (सेवाकर वगळून) एवढया फी वर काम चालू ठेवावे लागणार आहे.

४.८ बारा महिन्यानंतर या विषयावर पुनर्वलोकन करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरविले.

४.९ तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०० :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मे. राईटस् या संस्थेच्या प्रस्तावाचा विचार करुन वडाळा व करी रोड येथे मोनोरेलला रेल्वेमार्ग ओलांडण्यासाठीच्या पर्यवेक्षणाचे काम करण्यासाठी रु.१.३५ कोटी (सेवाकर वगळून) इतक्या रक्कमेकरिता नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सल्लागाराच्या एकूण खर्चाच्या २० टक्के पर्यंतच्या अतिरिक्त मनुष्यबळासाठी लागणा-या तफावत खर्चास मान्यता देण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ५ :</u> <u>ऐरोली-कटाई नाका महामार्ग प्रकल्पाकरिता सुसाध्यता अभ्यास, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि निविदा कागदपत्रे (Bid Document) आणि व्यवस्थापन प्रक्रिया तयार करण्याकरिता M/s. STUP Consultants आणि M/s.Ernst & Young (संयुक्त उपक्रम) यांची सल्लागार म्हणून नियुक्तीकरिता मंजुरी मिळण्याबाबत.</u>**

५.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सर्वंकष परिवहन अभ्यासामध्ये मुंबई महानगर प्रदेशाच्या भविष्यातील प्रवास गरजा लक्षात घेऊन क्षितिज वर्ष २०३१ पर्यंत व्यापक परिवहन जाळे प्रस्तावित केलेले आहे. यामध्ये प्रस्तावित असलेले काही

महामार्ग अस्तित्वात नसलेले मार्ग (Missing link) आहेत, सदर मार्गांची अंमलबजावणी झाल्यानंतर मुंबई व महानगर प्रदेशातील इतर भागात लवकर पोहोचण्यास मदत होईल.

५.२ प्रस्तावित केलेल्या महामार्गाच्या जाळयांपैकी नाहूर (पूर्व द्रुतगती महामार्ग) ते बदलापूर (३३.८ कि.मी.) हया महामार्गाचा प्राधान्यक्रम सूचित समाविष्ट आहे. सदर महामार्गाची तीन टप्प्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येणार असून त्यामध्ये पारसीक डोंगरातून १.५ कि.मी. चा बोगदा प्रस्तावित आहे. सदर टप्प्यांपैकी ऐरोली पुल ते कटाई नाका हा अस्तित्वात नसलेला मार्ग (Missing link) असून, सदर मार्गासाठी सुसाध्यता अभ्यास, सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा कागदपत्रे (Bid Document) आणि व्यवस्थापन प्रक्रिया तयार करण्याकरीता सल्लागार नेमण्याचे प्रस्तावित आहे.

५.३ प्रस्तावित प्रकल्पाकरीता सल्लागाराकडून विनंती प्रस्ताव (RFP) पाठविण्याकरीता दिनांक १५ ऑक्टोबर, २०११ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसारित करण्यात आली आणि सदर जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक १५ डिसेंबर, २०११ पर्यंत ५ सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले. विनंती प्रस्तावाच्या खंड ५ अन्वये जो सल्लागार संयुक्तिक तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण संपादन करेल, अशा सल्लागारास प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नेमण्यात येईल. या अनुषंगाने M/s. STUP Consultants आणि M/s. Ernst & Young (संयुक्त उपक्रम) यांचे संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण असल्यामुळे M/s. STUP Consultants आणि M/s. Ernst & Young (संयुक्त उपक्रम) यांची नेमणूक करण्याची शिफारस मूल्यमापन समितीने केली.

५.४ उपरोक्त काम लवकरात लवकर हाती घेण्याकरीता व सर्वेक्षणाचे काम पावसाअगोदर सुरु करुन पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे तसेच कार्यकारी समितीची बैठक दरम्यानच्या काळात निश्चित नसल्याने कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीस अधिन राहून मा. मुख्य सचिव, आणि अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर प्रस्तावास दिनांक २८ मार्च, २०१२ रोजी मान्यता दिली आहे.

५.५ प्राधिकरणातील प्रकल्पांकरीता सल्लागारांची नियुक्ती करताना ८०:२० आणि ७५:२५ असे वेगवेगळे निकष ठरविण्यात आलेले आहेत हे योग्य नाही असे मत कार्यकारी समितीच्या

सदस्यांनी व्यक्त केले. त्यामुळे भविष्यात विविध कामाकरिता सल्लागारांची नियुक्ती करताना समान निकष ठरविण्यात यावेत.

५.६ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१२०१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे ऐरोली-कटाई नाका महामार्गाच्या प्रकल्पाकरिता सुसाध्यता अभ्यास, सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा कागदपत्रे (Bid Document) आणि व्यवस्थापन प्रक्रिया तयार करण्यासाठी M/s. STUP Consultants आणि M/s. Ernst & Young यांच्या संयुक्त उपक्रमास रु.१,४५,८३,३००/- (रुपये एक कोटी पंचेचाळीस लाख त्र्याऐंशी हजार तीनशे फक्त) अधिक सेवा कर एवढया शुल्क रक्कमेवर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ६ : कलानगर जंक्शन, वांद्रे (पूर्व) येथे वाहतुकीत सुधारणा करण्यासाठी भुयारी मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा कागदपत्रे व निविदा प्रक्रिया व्यवस्थापन तयार करण्यासाठी मे.स्टुप कंन्सल्टंट प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून नियुक्तीकरिता कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबत.

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलात अंदाजे ६०% जागांवर विविध संस्थांची कार्यालये सुरु झाली असून नुकताच मे.भारत डायमंड बोर्स या संस्थेने त्याचा कार्यभार सुरु केलेला आहे. त्यामुळे वांद्रे-कुर्ला संकुलात येणा-या व जाणा-या वाहनांची तसेच सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत सुध्दा वाढ झाल्याचे दिसून येते. कलानगर जंक्शनवर विशेषतः सकाळी व संध्याकाळी वाहतुकीची प्रचंड कोंडी आढळते. वांद्रे-कुर्ला संकुलातील परिवहन व्यवस्था सुसाध्य होण्याकरिता वाहतुकीचा सर्व्हे करणे,

भुयारी मार्ग व उड्डाणपुलाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरिता सल्लागारांकडून विनंती प्रस्ताव मागविण्यात आले. मे.स्टुप कन्सल्टंटस् प्रा.लि. यांचे संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण असल्यामुळे त्यांची सल्लागार म्हणून नेमणुक करण्याची शिफारस करण्यात आली. निविदा प्रक्रिया मार्च, २०१२ मध्ये पार पाडली होती. सदर प्रस्तावास मा.माजी मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांची मान्यता घेऊन मे.स्टुप कन्सल्टंटस् प्रा.लि. यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सल्लागारांनी त्यांचे काम सुरु केलेले असून काम प्रगतीपथावर आहे. मे.स्टुप कन्सल्टंटस् प्रा.लि. यांचा देकार रक्कम रु.१,७५,८२,५००/- अधिक सेवा कर इतक्या रक्कमेवर नियुक्ती करण्यास कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव महानगर आयुक्त यांनी सादर केला. श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी मे.स्टुप कन्सल्टंट प्रा.लि. यांना भुयारी मार्गाबाबतचा अनुभव आहे का? अशी विचारणा केली. मे.स्टुप यांनी डी.एम्.आर.सी. (Delhi Metro Rail Corporation) साठी भुयारी मार्गाबाबतचा सल्ला दिला असल्याचे व ही कामे पूर्ण झाली असल्याचे त्यांच्या निविदेत नमूद केले आहे असे मुख्य अभियंता यांनी सांगीतले.

६.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०२ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे कलानगर जंक्शन, वांद्रे (पूर्व) येथे वाहतुकीत सुधारणा करण्यासाठी भुयारी मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा कागदपत्रे व निविदा प्रक्रिया व्यवस्थापन तयार करण्यासाठी मे.स्टुप कन्सल्टंटस् प्रा.लि. यांच्या रु.१,७५,८२,५००/- (रु.एक कोटी पंच्च्याहत्तर लाख ब्याऐंशी हजार पाचशे फक्त) अधिक सेवाकर इतक्या सल्लागार रक्कमेवर नियुक्ती करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

...१४/-

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ७ : <u>मुंबई महानगर प्रदेशात तळोजा येथे सामाईक भरावभूमी प्रकल्पाच्या निविदा दस्तऐवज म्हणजेच "विनंती वजा योग्यता"/ "विनंती वजा प्रस्ताव" तयार करणे, निविदा प्रक्रिया व्यवस्थापन आणि प्रकल्प व्यवस्थापन सेवांसाठी "व्यवसायीक सल्लागारांची" (Transaction Advisor) नेमणूक - सुधारित कंत्राट रक्कमेस मान्यता प्राप्त करणे.</u>**

७.१ सदर बाब टिप्पणीवर चर्चा करताना अति. महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात शास्त्रोक्त पध्दतीने घनकच-यावर प्रक्रिया व शास्त्रोक्त भरावभूमी तळोजा येथे विकसित करण्याचा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतलेला आहे. शास्त्रोक्त पध्दतीने भरावभूमी विकसित करण्याच्या व दिर्धमुदतीच्या तत्वावर कार्यरत ठेवण्यायोग्य व्यवस्थापनाच्या तांत्रिकी कामामध्ये विविध प्रकारे सहाय्यभूत होण्यासाठी "राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था" (National Environmental Engineering Research Institute) हया संस्थेस सल्लागार म्हणून दोन वर्षाच्या कालावधीसाठी रु.३४५.४० लाख (रु.तिनशे पंच्चेचाळीस लाख चाळीस हजार फक्त) (१२.३६% सेवाकरासहीत) एवढया कंत्राट रक्कमेवर नेमणूक करण्यासाठीच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या २२६ व्या बैठकीत ठराव क्रमांक ११२२ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

७.२. मेसर्स के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. हयांनी "नीरी" हया संस्थेसमवेत सामाईक भरावभूमी प्रकल्पासाठी वित्तीय व्यवस्थापनाबाबत (Financial Management) योजना तयार करण्याचे काम केलेले असल्याने व हया प्रकल्पाबाबतची त्यांना सर्व प्राथमिक माहिती, तपशिल प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच अवगत असल्याने तसेच प्राधिकरणाने मेसर्स के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. हयांना दोन वर्षाच्या कालावधीसाठी "कुशल व्यवसायीक सेवांसाठी" (Master Professional Services) दिनांक १३ नोव्हेंबर, २००९ मध्ये नेमणूक केलेली असल्याने त्यांची "व्यवसायीक सल्लागार" (Transaction Advisor) म्हणून त्याच धर्तीवर नेमणूक करण्याचे ठरविण्यात आले.

...१५/-

७.३. मेसर्स के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस यांनी सामाईक भरावभूमी प्रकल्पाच्या "व्यवसायीक सल्लागार" (Transaction Advisor) सेवांसाठी मेसर्स के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. यांना रु.४० लाख अधिक सेवा कर हया ठोस रक्कमेस साडेसात महिन्यांचे कालावधीसाठी सल्लागार सेवा देण्याचे मान्य केले व महानगर आयुक्तांच्या मान्यतेनंतर त्यांना दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० रोजी कार्यालयीन आदेश देण्यात आला.

७.४. परंतु माहे जून, २०११ पूर्वीच १५८ मनुष्य दिवस (Man Days) व्यवस्थापक पदाच्या खालच्या पदाच्या सेवेसाठी व ५२ मनुष्य (Man Days) दिवस भागीदार/ व्यवस्थापक पदाच्या सेवेसाठी निविदापूर्व दस्तऐवज तयार करण्याच्या पूर्वीच प्रस्तावात नमुद केलेल्या कारणास्तव वापरले गेले. म्हणून अतिरिक्त वाढीसाठी मेसर्स के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. हयांनी "जुलै, २०११ ते डिसेंबर, २०११" व "जानेवारी, २०१२ ते प्रकल्पासाठीच्या विकासकास (Developer Agencies) कार्यालयीन आदेश देईपर्यंत" हया कालावधीसाठी एकूण रु.४२,१३,४४०/- अधिक सेवाकर एवढया अतिरिक्त रक्कमेची मागणी केलेली होती. परंतु, त्यांनी दिलेल्या मनुष्य दिवसांचे विश्लेषणावर तपासणी, छाननी केल्यानंतर व देय शुल्काबाबत त्यांचे समवेत वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी अतिरिक्त रक्कम रु.३०,८३,८५०/- अधिक सेवा कर या रक्कमेनुसार प्रवर्तकास कार्यालयीन आदेश देईपर्यंत सल्लागार सेवा देण्याचे मान्य केले. म्हणून त्यांना अतिरिक्त रक्कम रु.३०,८३,८५०/- अधिक सेवा कर देण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे.

७.५ श्री. एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती हयांनी मूळ कंत्राटाविषयी चर्चा केली व मूळ प्रस्तावातील भागीदार/ व्यवस्थापक पद (Partner/Manager) व व्यवस्थापक पदाच्या खालच्या (Below Manager) मनुष्य दिवसांचा (Man Days) उल्लेख मूळ प्रस्तावात तपशिल दिलेला होता का? तसेच दोन्ही दर सारखेच असणार का? अशी विचारणा केली त्यावर बाब टिप्पणीतील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये उल्लेख केलेला आहे व वाढीव मनुष्य दिवसांसाठी दर मूळ प्रस्तावानुसार असेल असा खुलासा केला. परंतु त्यांनी पुन्हा विचारणा केली की, मेसर्स के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी मूळ प्रस्तावात दोन्ही पदांसाठीच्या मनुष्य दिवसांची (Man Days) संख्या निश्चित केलेली होती का? त्यावर महानगर आयुक्तांनी तपासणी करण्यात येईल असे सांगितले.

७.६ त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०३ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील महानगरपालिका व नगरपरिषदांसाठी दीर्घ मुदतीच्या तत्वावर कार्यरत ठेवण्यायोग्य सामाईक भरावभूमींच्या विकासाच्या कामामध्ये विविध प्रकारे सहाय्यभूत होण्यासाठी "मेसर्स के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि." हया संस्थेस "व्यवसायीक सल्लागार" (Transaction Advisor) म्हणून ४० लाख अधिक (१०.३०% दराने) सेवाकर म्हणजेच रु.४४,१२,०००/- एवढया कंत्राट रक्कमेत फेरफार करुन मनुष्य दिवसात (Man Days) झालेल्या वाढीमुळे अतिरिक्त येणारा खर्च रु.३०,८३,८५०/- अधिक १२.३६% दराने सेवाकर म्हणजेच रु.३४,६५,०१४/- आणि त्या अनुषंगाने येणा-या सुधारीत कंत्राट रक्कम रु.७८,७७,०१३.८६ म्हणजेच एकूण रक्कम रु.७८,७७,०१४/- एवढे अधिदान करण्यास मान्यता देत आहे. तसेच रु.७८,७७,०१४/- एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

## <u>बाब क्र. ८ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष व इतर तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.</u>

८.१ या बाब टिप्पणीवर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर नामांकित व्यक्तीची सह-अध्यक्ष म्हणून तसेच पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र, सागरी जीवन आणि भूदृष्य (लँड स्केपिंग) या विषयातील ३ तज्ञ व्यक्तींची सदस्य म्हणून प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने नेमणूक करावयाची असते. सह-अध्यक्ष व सदस्यांच्या सदस्यत्वाचा कालावधी तीन वर्षांचा आहे.

८.२ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत सदस्यांचे नामनिर्देशन करावे असे सुचविले.

...१७/-

८.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर बाब ही या अगोदरच लांबणीवर टाकण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे.

८.४ चर्चेच्या दरम्यान असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेचे सह-अध्यक्ष म्हणून श्रीमती फिरोझा जे.गोदरेज यांना पुढील ३ वर्षाकरीता नव्याने नामनिर्देशन करण्यात यावे तसेच अन्य ३ तज्ञ सदस्यांपैकी डॉ.एम.आर.अल्मेडा हे पुढील कालावधीकरीता सदस्य म्हणून कार्य करण्यास इच्छुक आहेत किंवा नाही याबाबत त्यांचेकडे विचारणा करावी.

८.५ चर्चेनतर, महाराष्ट्र निसर्ग उद्यान या संस्थेवर रिक्त झालेल्या तीन तज्ञ सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार कार्यकारी समितीने शासनाचे मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरविले.

८.६ तद्नुसार, खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला :-

<u>ठराव क्र.१२०४ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीच्या नियम क्र.९ च्या पोट-कलम (दोन) आणि नियम क्र.१२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे श्रीमती फिरोझा जे.गोदरेज यांची महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष म्हणून पुढील ३ वर्षांसाठी नामनिर्देशन करीत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीच्या नियम क्र.९ च्या पोट-कलम (अकरा), (बारा) आणि (तेरा) आणि नियम क्र.१२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे उर्वरीत तीन तज्ञ सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना देण्यात येत आहेत.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरिल ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ९ : संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या मोनोरेल प्रकल्पाचे सुरक्षितता मूल्यांकन करण्याकरिता SMRT (International) यांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.**

९.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५ व्या बैठकीत ठराव क्र. ११९० अन्वये २० कि.मी. लांबीच्या संत गाडगे महाराज चौक-वडाळा-चेंबूर मार्गिकेवर मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी मे. लार्सन ॲन्ड टुब्रो आणि मे. स्कोमी इंजिनिअरिंग, मलेशिया समुहाची कंत्राटदार म्हणून रु.२,४६० कोटी (कर वगळून) या रक्कमेवर नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात आली असून मोनोरेल प्रकल्पाच्या कामास दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ रोजी सुरुवात झाली.

९.२ सदर प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. सुधारित वेळापत्रकानुसार टप्पा-१ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. टप्पा-१ ची संपूर्ण चाचणी ऑगस्ट, २०१२ मध्ये सुरु होणार असून नोव्हेंबर, २०१२ मध्ये प्रकल्पामधील टप्पा-१ प्रवाशांसाठी खुला होणे अपेक्षित आहे. मोनोरेल टप्पा-१ ची प्रवाशांसाठी व्यावसायिक सुरुवात करण्यापूर्वी आणि देखभाल व कार्यप्रणालीच्या तयारीकरिता मुंबई मोनोरेल प्रकल्पाचे सर्वांगिण सुरक्षिततेचे मूल्यांकन करणे अत्यंत गरजेचे आहे. सुरक्षितता मूल्यांकन करण्याकरिता आणि कार्य व देखभालीची तयारी करण्याकरिता मोनो रेल/मेट्रो रेल राबविण्याचा अनुभव असलेल्या तज्ञ अशा सक्षम संस्थेची गरज लक्षात घेता शासनास दिनांक २४ जून, २०११ रोजी निविदा मागविण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक १५ सप्टेंबर, २०११ रोजी मंजूरी दिल्यानंतर तीन संस्थांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी पुढील दोन संस्थांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ रोजी प्रस्ताव प्राधिकरणास सादर केले आहेत :-

१) SMRT (International), Singapore रु.४,०४,४९,६००/- (करांसहित)

२) MTR Corporation, Hong Kong रु.४,४४,४७,३३७/- (करांसहित)

...१९/-

९.३ अतिरिक्त महानगर आयुक्त - २, वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग आणि प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग असे सदस्य असलेल्या निविदा स्थायी समितीने प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर विचारविनिमय करुन दिनांक २५ एप्रिल, २०१२ रोजी SMRT International या लघुत्तम निविदाकाराबरोबर झालेल्या वाटाघाटी बैठकीमध्ये अटीं व शर्तीवर चर्चा करण्यात आल्यानंतर SMRT International या सल्लागाराची नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात आली.

९.४ सदर संस्थेच्या कार्यविस्तारामध्ये, सुरक्षितता, मोनोरेल (Rolling Stock), Signaling, Bridges, Power Supply and Traction and beam switches यांकरिता सहा तज्ञ अभियंत्यांचे मनुष्यबळ १२ महिने देणे अभिप्रेत असून या संस्थेस अशा कामाचा सुसंगत अनुभव आहे. SMRT International या संस्थेला Sentosa मोनोरेलचा विशेष अनुभव असून दुबई येथील मोनोरेल कार्यप्रणालीचाही त्यांनी काही काळ अनुभव घेतला आहे.

९.५ सदर प्रस्तावावर श्री.सिताराम कुटें, सदस्य, कार्यकारी समिती व महापालिका आयुक्त यांनी या मोनोरेल प्रकल्पाच्या सुरक्षितता मुल्यांकन आणि स्थलांतर (evacuation) यासाठी किती वेळ लागेल? आणि कसे स्थलांतर करणार? या विषयी विचारणा केली.

९.६ या विषयावर माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले की, मोनोरेल प्रकल्प जगात टोकियो, ओसाका आणि अमेरिका या ठिकाणी गेल्या ५० वर्षापासून अस्तित्वात असून कोणताही मोठा अपघात झाल्याची नोंद नाही. तसेच मोनोरेल प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रकारच्या सुरक्षितता मुल्यांकन पध्दती अस्तित्वात आहेत. पहिला पर्याय म्हणजे मोनोरेलचे दरवाजे उघडून आपत्तकालीन शुटमधून प्रवाशांना खाली उतरविण्यात येते. दुसरा पर्याय म्हणजे जो मोनोरेल ट्रॅक बाधित झालेला नसेल त्या ट्रॅकवरुन आपत्तकालीन मोनोरेल येऊन प्रवाशांना त्यामध्ये स्थलांतरीत करुन घेणे. तिसरा पर्याय म्हणजे मोनोरेल ढकला/ओढा या पध्दतीने दुस-या मोनोरेल मार्फत नजिकच्या स्थानकापर्यंत नेण्यात येऊन प्रवाशांना स्थानकामध्ये उतरविण्यात येते. तसेच मोनोरेल प्रकल्पाची सुरक्षितता चाचणी कंत्राटदाराकडून नेमणूक करण्यात आलेल्या सुरक्षितता अभियंत्याकडून करण्यात येईल तद्नंतर सदर चाचणीचे परिक्षण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. लुईस बर्जर ग्रुप लि. यांच्याकडून करण्यात येईल

व त्यानंतर मे. SMRT International यांच्याकडून चाचणीचे परिक्षण केल्यानंतर शिफारस घेण्यात येईल. या तिन्ही सुरक्षितता अभियंत्यांकडून सुरक्षितता चाचणीचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच मोनोरेल प्रकल्प लोकांकरीता खुला करण्यात येईल.

९.७ या विषयावर श्री. एन.व्ही. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, सल्लागाराने प्रमाणपत्र दिल्यानंतर शासनाने प्राधिकृत केलेल्या अभियंता किंवा तज्ञ व्यक्तीकडून चाचणी करुन घेणे योग्य ठरेल.

९.८ या विषयावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सुधारीत ट्रामवे कायदा (मुंबई) अंतर्गत हा मोनोरेल प्रकल्प सुरु करण्यात आला असून या कायद्याअंतर्गत शासनातर्फे एका अभियंत्याची नेमणूक करणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे एक निवृत्त रेल्वे सुरक्षितता आयुक्त यांची नेमणूक करणे विचाराधीन आहे.

९.९ वरील प्रस्तावावर श्री. एन.व्ही. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, मे. SMRT International यांच्या कामाच्या व्याप्तीमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना /चाचणी यांचा अंतर्भाव करण्यात यावा. तसेच त्यांच्याकडून सुरक्षितता ऑडिट सुध्दा तयार करुन घेण्यात यावे.

९.१० मा. अध्यक्ष आणि मुख्य सचिव यांनी अशी सूचना दिली की, मोनोरेलच्या प्रवाशांकरीता विमा संरक्षण देण्याचा विचार करावा.

९.११ तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०५ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे SMRT (International), Singapore या संस्थेस मोनोरेल सुरक्षितता मुल्यांकनासाठी म्हणूनच रु.४,०४,४९,६००/- (करांसहित) या रक्कमेवर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सल्लागाराच्या एकूण खर्चाच्या २० टक्के पर्यंतच्या अतिरिक्त मनुष्यबळासाठी लागणा-या तफावत खर्चास मान्यता देण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. १० : १) दिनांक ३० सप्टेंबर, २०११ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे**
**२) दिनांक ३१ डिसेंबर, २०११ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

१०.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०११ व दिनांक ३१ डिसेंबर, २०११ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली, त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र. ११ : प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ नोव्हेंबर, २०११ ते ३१ मार्च, २०१२**

दिनांक १ नोव्हेंबर, २०११ ते दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१२ : मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल- दिनांक १ ऑक्टोबर, २०११ ते दिनांक ३१ मार्च, २०१२.**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०११ ते दिनांक ३१ मार्च, २०१२ चा सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र. १३ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांगणी ते कर्जत व नालासोपारा-निर्मळ रस्त्याच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (दुसरी बोली)**

१३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने व बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील

पायाभुत सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत सुमारे रु.१,११३.३५ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल बांधण्याच्या कामास दिनांक ८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२९व्या बैठकीत ठराव क्रमांक १२६४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मुख्य अभियंता यांनी रस्त्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठाणे व रायगड जिल्हाच्या सन २०१०-११ च्या दरसूचीवर आधारीत सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

१३.२ वांगणी-कर्जत राज्य महामार्ग क्र.३५ ची २१.१० कि.मी. लांबीच्या पुलांच्या बांधकामासहीत २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे (पॅकेज-४) व नालासोपारा-निर्मळ प्र.जि.मा.३९ ची १२.५० कि.मी. लांबीच्या पूलांच्या बांधकामासहीत २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे (पॅकेज-७) या कामाकरीता दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३३ व्या बैठकीत ठराव क्र.११९७ अन्वये सुचित केल्याप्रमाणे फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत.

१३.३ प्राप्त सर्व निविदा बाबत अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निविदा समितीच्या दिनांक २५ एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. निविदा समितीच्या शिफारशींनुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आलेला आहे असे महानगर आयुक्त यांनी विषद केले.

१३.३.१ वांगणी-कर्जत राज्य महामार्ग क्र.३५ चे २१.१० कि.मी. लांबीच्या पुलांच्या बांधकामासहीत २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे (पॅकेज-४) या कामासाठी एकुण पाच देकार प्राप्त झाले असून मे.पाटील कंन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींच्या परिमाणांचा पुरेसा अनुभव नसल्यामुळे त्यांचा वित्तीय देकार उघडण्यात आला नाही.

१३.३.२ लघुत्तम देकारकाराशी वाटाघाटी केल्यानंतर मे.ईगल कंन्स्ट्रक्शन कं. यांनी त्यांच्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १६.२०% कमी दराचा देकार हा वाजवी असल्याचे कळविले आहे. त्यांनी सादर केलेले देकाराचे समर्थन विचारात घेता त्यांचा देकार कार्यकारी समितीस स्विकृतीकरीता सादर करण्यात आला आहे.

१३.३.३ नालासोपारा-निर्मळ प्र.जि.मा.३९ ची १२.५० कि.मी. लांबीच्या पुलांच्या बांधकामासहीत २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे (पॅकेज-७) या कामासाठी एकूण चार देकार प्राप्त झाले असून मे.पाटील कंन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींच्या परिमाणांचा पुरेसा अनुभव नसल्यामुळे त्यांचा वित्तीय देकार उघडण्यात आला नाही.

१३.३.४ लघुत्तम निविदाधारकाशी वाटाघाटी केल्यानंतर मे. रेलकॉन इंन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांनी त्यांच्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ११.०७% कमी दराचा देकार हा वाजवी असल्याचे कळविले आहे. त्यांनी सादर केलेले देकाराचे समर्थन विचारात घेता त्यांचा देकार कार्यकारी समितीस स्विकृतीकरीता सादर करण्यात आला आहे.

१३.४ सदरचा रस्त्याच्या दुरावस्थेबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींच्या तक्रारी लक्षात घेता पावसाळयापूर्वी रस्ता सुस्थितीत ठेवण्याकरीता रस्त्याची पावसाळयापूर्वी दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे सदर कामांच्या लघुत्तम निविदाकारांना निविदा स्विकृती पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे सदर कामांच्या निविदा स्विकृतीस कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यास कार्यकारी समितीस प्रस्तावाव्दारे विनंती करण्यात आली आहे.

१३.५ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर रस्त्यांच्या निविदा कार्योत्तर मंजुरीसाठी सादर केल्या आहेत. तेव्हा सद्यःस्थितीत रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे काय? याबाबत मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, पावसाळयापुर्वी आवश्यक खड्डे भरण्याची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. त्यानंतर श्री. एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचित केले की, विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पाच्या कामासाठी थर्ड पार्टी ऑडीट करण्याबाबत प्राधिकरणाने कार्यवाही करावी.

१३.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१२०६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत :

१. वांगणी-कर्जत राज्य महामार्ग क्र.३५ चे २१.१० कि.मी. लांबीचे पूलांच्या बांधकामासहित २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे (पॅकेज ४) या कामासाठी मे.ईगल कन्स्ट्रक्शन कं. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.२०% कमी दराची म्हणजे किंमत रु. ७५.८१ कोटीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

२. नालासोपारा-निर्मळ प्र.जि.मा.३९ चे १२.५० कि.मी. लांबीचे पूलांच्या बांधकामासहित २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे (पॅकेज ७) या कामासाठी मे. रेलकॉन इंन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०७% कमी दराची म्हणजे किंमत रु.३७.२२ कोटीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत व निवासी इमारत बांधणे - मंजूर निविदेवरील अतिरिक्त बाबी व वाढीव खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

१४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'इ' ब्लॉकमधील भूखंडांवर प्राधिकरणाच्या अधिका-यांसाठी निवासी इमारत बांधणे तसेच नविन अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत बांधणे इ. कामांचा अंतर्भाव आहे. निवासी इमारत ही माहे मे, २०१० मध्ये पूर्ण करण्यात आली असून तिचा वापर सुरु करण्यात आलेला आहे. सदर कामाकरिता प्राधिकरणाच्या दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजीच्या १२० व्या बैठकीमध्ये निवासी इमारत व कार्यालयीन इमारतीच्या बांधकामासाठी अनुक्रमे रु.९.०० कोटी व

रु.२८.०० कोटी (एकूण रु.३७.०० कोटी) इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली होती. निवासी इमारतीच्या बांधकामात स्थापत्य, विद्युत, अग्निशमन यंत्रणा, उद्वाहने इ. सर्व कामांचा अंतर्भाव करण्यात आलेला होता. कार्यालयीन इमारतीचा फक्त सांगाडा (Structure Work) पूर्ण करणे इतकाच होता. प्रकल्पाचे वास्तु विशारद व समंत्रक मे.टीम वन आर्किटेक्ट (इं.) प्रा.लि., मुंबई यांनी सादर केलेल्या मूळ संकल्पनेनुसार कार्यालयीन इमारतीची संरचना सुरुवातीला एका टोकास अधांतरी असलेली (Cantilever Structure) अशी होती. परंतु अधांतरी भागाची लांबी जास्त असल्याने अधिकतम सुरक्षितता व भविष्यातील इमारत देखभाल करण्याच्या दृष्टीकोनातून दोन्ही टोकांस भक्कम आधार देण्याचे ठरल्याने मूळ संकल्पनेत व अंदाजपत्रकात बदल करणे क्रमप्राप्त ठरले. त्या अनुषंगाने काही बाबींच्या परिमाणात वाढ झाली व अतिरिक्त बाबींचा समावेश करावा लागला. तसेच सदरच्या इमारतीस मिळालेल्या पर्यावरण विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (Sewerage Treatment Plant), (Rain Water Harvesting) व सौरउर्जा (Solar Energy) इ. अतिरिक्त बाबींपोटीसुध्दा मूळ खर्चात वाढ होणार असून सदरची इमारत ही हरित इमारत (Green Building) म्हणून संकल्पित करावयाचे ठरल्याने त्यासाठी लागणारे आवश्यक ते सर्व निकष परिपूर्ण करण्यासाठी काही अतिरिक्त बाबींचा समावेश करावा लागणार आहे. तसेच इमारतीच्या मूळ संकल्पनेत व संरचनेत बदल झाल्यामुळे बांधकाम क्षेत्रात (Construction Area) सुमारे ४०% जास्त क्षेत्र वाढत असल्याने काही बाबींमध्ये वाढ व अतिरिक्त बाबी प्रस्तावित आहेत. निवासी इमारतीच्या मूळ स्विकृत निविदेत एकूण रु.३.९६ कोटी इतकी वाढ झालेली असून कार्यालयीन इमारतीत एकूण रु.२९.८३ कोटी इतकी वाढ अपेक्षित आहे. स्विकृत निविदेपेक्षा ही रक्कम ६०.९८% इतकी वाढलेली आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, इमारत वापराच्या व पूर्णत्वाच्या दृष्टीने बाह्यदर्शनी काम, अंतर्गत स्थापत्य व उद्वाहनाची कामे, विद्युत संबंधित कामे, वातानुकुलीन यंत्रणे संबंधित कामे व अंतर्गत सजावटीची कामे इ. कामे मूळ कामाव्यतिरिक्त स्वतंत्रपणे सक्षम स्तरावरुन प्रशासकीय मान्यता घेऊन व निविदा मागवून कार्यान्वित करण्यात आली आहेत.

१४.२ सदर बाबीवर कार्यकारी समितीच्या सदस्यांनी खालीलप्रमाणे सूचित केले :-

(१) मूळ कंत्राट ज्या अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आले होते त्याबाबतची

सविस्तर माहिती स्पष्टपणे निदर्शनास आणावी.

(२) मूळ कामाव्यतिरिक्त (structure work) उर्वरित कामे विभक्तपणे / स्वतंत्रपणे निविदा मागवून (शक्यतो अशा प्रकारे कामे दिली जात नाहीत) का करण्यात आली याची सविस्तर कारणमिमांसा देण्यात यावी. सदरच्या उर्वरित कामांच्या निविदा ह्या प्राप्त लघुत्तम निविदा दराने काम करण्याचा / नाकारण्याचा हक्क शाबूत ठेवण्याच्या तत्वावर (on First Right of Refusal Basis) मागविण्यात आल्याची कारणे स्पष्ट करावीत तसेच मूळ कंत्राटाचा भाग विचारात घेऊन सदरची उर्वरित कामे एकत्रित न करण्याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

(३) मूळ कामाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करताना विचारात घेतलेला तपशील (जसे क्षेत्रफळ, दर इ.) सादर करणे आवश्यक आहे असेही सूचित करण्यात आले.

१४.३ सदर उर्वरित कामांपैकी बाह्यदर्शनी काम, अंतर्गत स्थापत्य व उद्वाहनाची कामे प्रगतीपथावर असून इतर कामे अद्याप सुरु झालेली नसल्याने व सदर कामाचा निविदेनुसार पूर्ण करावयाचा कालावधीही संपलेला असल्याने त्या तिन्ही कामांची नव्याने एकत्रित निविदा मागवून सदर काम पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

१४.४ सदर बाबीवर सविस्तर चर्चेअंती मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्रस्तावाचे अवलोकन करता सदर कामाच्या व्याप्तीमध्ये व कामामध्ये झालेल्या वाढीचा विचार करता श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांना झालेल्या वाढीचा तसेच कामाच्या व्याप्तीचा सविस्तर आढावा घेण्यास व त्यासंबंधी कार्यकारी समितीस अहवाल सादर करण्यास सांगितले. तद्नंतर संदर्भित विषयाबाबत स्वतंत्र बैठक घेऊन पुढील निर्णय घेण्याचे ठरले.

**<u>बाब क्र.१५ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत (दुसरी बोली).</u>**

१५.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने व बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सुमारे रु.१,११३.३५ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल

...२७/-

बांधण्याच्या कामास दिनांक ८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२९व्या बैठकीत ठराव क्रमांक १२६४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मुख्य अभियंता यांनी रस्त्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठाणे व रायगड जिल्हयाच्या सन २०१०-११ च्या दरसूचीवर आधारीत सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. रस्त्यांच्या ७ कामासाठी कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

१५.२ उपरोक्त कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागांराची नियुक्ती करण्यासाठी प्रथमतः सात भागांमध्ये निविदा दिनांक १२ सप्टेंबर, २०११ रोजी मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सर्व कामांसाठी मे. माहिमतूरा कंन्सल्टंस प्रा.लि. यांचा लघुत्तम देकार ०.७९८% ते १.२४५% प्रकल्प किंमतीचा प्राप्त झाला होता. तथापि, मे. माहिमतूरा कंन्सल्टंस प्रा.लि. यांचे नांव काळया यादीत नोंद करण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रस्तावित केलेली असल्याने व हायराईज समितीमध्ये श्री. शैलेश माहिमतूरा यांच्यावर लाचलुचपत विभागाने केलेली कार्यवाही विचारात घेता, मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या निविदा समितीत सर्व निविदा नाकारुन नव्याने निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला.

१५.३ सदर कामासाठी फेरनिविदा सात भागांमध्ये दिनांक २४ फेब्रुवारी, २०१२ रोजी मागविण्यात आल्या होत्या, प्राप्त सर्व निविदांबाबत अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांच्या अध्यक्षतेखाली निविदा समितीच्या दिनांक २५ एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. निविदा समितीच्या शिफारशींनुसार प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आलेला आहे.

१५.४ निविदा शर्तीनुसार लघुत्तम देकार असलेल्या निविदाकारांने निविदा शर्तीची एकत्रितपणे पुर्तता करणे आवश्यक आहे. या निविदा सुचनेअंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार एकापेक्षा जास्त निविदांमध्ये लघुत्तम निविदाकार झाल्यास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची पात्रता, निविदा सुचना व निविदेत नमुद केलेल्या शर्तीप्रमाणे एकत्रित निकषांना तपासला जाईल व अशा स्थितीत त्या आधारे प्राप्त असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास काम देण्यात येईल. अशी अट समाविष्ट करण्यात आली आहे.

...२८/-

१५.५ सदर कामांकरीता ५० देकार प्राप्त झाले असून खालील निविदाकार निविदेतील शर्तींची पुर्तता करत नसल्यामुळे त्यांचा वित्तीय देकार उघडण्यात आला नाही :-

अ) व्यवसायातील ५ वर्षे पेक्षा कमी अनुभव असल्यामुळे मे.आरकीटी टेक्नो कन्सल्टंट (इंडिया) प्रा.लि. अपात्र.

ब) निविदेतील नमुद करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणाच्या यंत्रसामुग्रीची पुर्तता होत नसल्यामुळे मे.क्रियेशन इंजिनियर्स अपात्र.

क) सनदी लेखापालाचे प्रमाणित केलेले, मागील ३ लेखा वर्षातील वार्षिक आर्थिक उलाढाल प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे मे. स्पेक्ट्रम टेक्नो कन्सल्टंट प्रा.लि. अपात्र.

१५.६ प्रस्तुत प्रकरणी पॅकेज क्र. १ व ५ साठी मे. एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि., पॅकेज क्र. २ व ४ साठी मे. श्रीखंडे प्रा. लि. तर पॅकेज क्र. ६ व ७ करिता मे. शिरीष पटेल आणि असोसिएट्स प्रा. लि. यांचे लघुत्तम देकार प्राप्त झाले आहेत. तथापि, उपरोक्त निविदाकारांपैकी कोणत्याही निविदाकाराने प्रत्येक कामाकरीता आवश्यक असणारे मनुष्यबळ स्वतंत्रपणे न दिल्यामुळे ते एकाच कामाकरिता पात्र होत आहेत. त्यामुळे अपात्र होणा-या लघुत्तम निविदाकारांऐवजी क्रमाने व्दितीय अथवा तृतीय लघुत्तम निविदाकारांशी वाटाघाटी करुन नंतर निवड करण्याचे प्रस्तावित केले आहे. अशी निवड करतांना प्राप्त देकारांचा एकत्रित विचार करुन कमीत कमी देय होणारी फी विचारात घेऊन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करण्यात आली असून त्यांच्याशी वाटाघाटीनंतर अंतिमतः देऊ केलेले देकार हे प्रथम लघुत्तम देकाराएवढे असून ते वाजवी व व्यवहार्य असल्याने निविदा स्विकृतीसाठी कार्यकारी समितीस सादर करण्यात आली आहेत. सदर निविदा शर्ती प्रमाणे सेवाकर हा वेगळा देणेबाबतची तरतूद आहे.

१५.७ श्री. एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे निदर्शनास आणले की, मे. एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि. यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून लालबाग उड्डाणपुलातील कामाबाबत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. याबाबतचा अंतिम निर्णय होईपर्यंत त्यांना आता काम देणे योग्य होणार नाही. यास्तव शिरसाड - अंबाडी राज्य महामार्ग क्र.४० चे २२.७० कि.मी. लांबीचे

२+२ मार्गीकामध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे (पॅकेज-१) या कामासाठी मे.एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि. यांची निविदा स्विकृती, त्यांच्यावरील लालबाग उड्डाणपूलाशी संबंधित कार्यवाही अंतिम होईपर्यंत सदर काम स्थगित ठेवावे असे ठरले.

१५.८ चर्चेअंती, बाब टिप्पणीतील प्रस्तावात बदल करुन पुढील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला :-

ठराव क्र. १२०७:

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत :-

१. शिरसाड - अंबाडी राज्य महामार्ग क्र. ४० चे २२.७० कि.मी. लांबीचे २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे पॅकेज-१ या कामासाठी मे.एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि. यांची निविदा स्विकृती प्राधिकरणाच्या लालबाग उड्डाणपुलाशी संबधित कार्यवाही अंतिम होईपर्यंत स्थगित ठेवण्यात यावी.

२. अंबाडी ते वाशिंद राज्य महामार्ग क्र. ४० व प्र.जि.मा. ४५ चे २१.२५ कि.मी. लांबीचे २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे पॅकेज-२ या कामासाठी मे. श्रीखंडे प्रा.लि. यांची प्रकल्प किंमतीच्या १.७१% दराची म्हणजेच रु.२.१२ कोटी किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

३. कल्याण-बदलापूर-वांगणी राज्य महामार्ग क्र.३५ चे २७.८० कि.मी. लांबीचे पूलांच्या बांधकामासहित २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे पॅकेज-३ या कामासाठी मे.पेंटॅकल कन्सलटंस प्रा.लि. यांची प्रकल्प किंमतीच्या ०.९९% दराची म्हणजेच रु.१.१६ कोटी किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

४. वांगणी-कर्जत राज्य महामार्ग क्र.३५ चे २१.१० कि.मी. लांबीचे पूलांच्या बांधकामासहित २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे पॅकेज-४ या

कामासाठी मे.टेक्नो कंन्सलटंट्स प्रा.लि. यांची प्रकल्प किंमतीच्या २.१०% दराची म्हणजेच रु.१.९० कोटी किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

५. कर्जत-हाळफाटा राज्य महामार्ग क्र.३५ व कर्जत ते चौक राज्य महामार्ग क्र.३८ चे २०.५४ कि.मी. लांबीचे पूलांच्या बांधकामासहित २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे पॅकेज-५ या कामासाठी मे. कंस्टुमा कंन्सलटंट्स प्रा.लि. यांची प्रकल्प किंमतीच्या २.२७% दराची म्हणजेच रु.२.३० कोटी किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

६. कटईनाका ते बदलापूर राज्य महामार्ग क्र.४३ चे १९.२९ कि.मी. लांबीचे पूलांच्या बांधकामासहित २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे पॅकेज-६ या कामासाठी मे. शिरीष पटेल आणि असोसिएट्स प्रा.लि. यांची प्रकल्प किंमतीच्या २.२०% दराची म्हणजेच रु.१.८२ कोटी किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

७. नालासोपारा-निर्मळ प्र.जा.मि. ३९ चे १२.५० कि.मी. लांबीचे पूलांच्या बांधकामासहित २+२ मार्गीकांमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण करणे पॅकेज-७ या कामासाठी मे. आरटीफेक्ट्स प्रोजेक्ट्स लि. यांची प्रकल्प किंमतीच्या ३.४०% दराची म्हणजेच रु.१.४२ कोटी किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

८. उपरोक्त २ ते ७ च्या कामापोटी देय होणा-या सेवा करासह मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र. १ : वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या छन्नमार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्वतंत्र अभियंत्याच्या सुधारीत खर्चास मंजूरी देण्याबाबत.**

या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक १६ मार्च, २००७ रोजीच्या २१९ व्या बैठकीतील ठराव क्र. १०३० अन्वये वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो रेल छन्नमार्गाच्या अंमलबजावणीकरीता स्वतंत्र अभियंता म्हणून लघुत्तम निविदाकार मे. लुईस बर्जर इन्कॉ (यु एस ए) - राईट्स लिमिटेड (जेव्ही) यांची रु. १४,९५,३७,७८९/- अधिक सेवाकर इतक्या फी वर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि लुईस बर्जर इन्कॉ (यु एस ए) - राईट्स लिमिटेड (जेव्ही) यांच्यामध्ये २७ एप्रिल, २००७ रोजी करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या.

सदर प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यानुसार बांधकामाचा कालावधी ५ वर्ष इतका आहे. सवलतदाराने दिलेल्या माहितीनुसार प्रकल्प मार्च, २०१३ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. करारानुसार प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतरचा सहा महिन्याचा कालावधी गृहीत धरता स्वतंत्र अभियंत्याचा कालावधी सप्टेंबर, २०१३ इतका असेल. परंतु काम पूर्ण करण्यास येणा-या अडचणी लक्षात घेता स्वतंत्र अभियंत्याचा कालावधी डिसेंबर, २०१३ पर्यंत गृहीत धरला आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतरचा सहा महिन्याचा कालावधी डिसेंबर, २०१३ पुर्वी पूर्ण झाला तर स्वतंत्र अभियंता यांना त्या कालावधी पर्यंतचे देयक अदा करण्यात येईल.

स्वतंत्र अभियंत्याने दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ च्या पत्राद्वारे सन २००७ ते सन २०११ या कालावधीत उपभोक्ता मूल्य सुचकामध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन फेब्रुवारी, २०११ ते जानेवारी, २०१२ पर्यंतचा कालावधीसाठी आणि फेब्रुवारी, २०१२ ते डिसेंबर, २०१३ या कालावधीसाठी कारारनाम्यातील दरापेक्षा अनुक्रमे ३०% आणि ४०% वाढीव दर देण्याची विनंती केली आहे.

सन २०१२ इतकीच महागाई भत्त्यामधील वाढ २०१३ मध्ये गृहित धरल्यास सन २०१० ते सन २०१३ मध्ये एकूण महागाई वाढ ५९% होईल. या तुलनेने स्वतंत्र अभियंत्याने ४०% वाढीची मागणी केलेली आहे, परंतु स्वतंत्र अभियंत्याबरोबर झालेल्या अनौपचारीक बैठकीमध्ये ही वाढ २५% द्यावी अशी शिफारस करण्यात आली.

स्वतंत्र अभियंत्यांचा होणारा खर्च स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सवलत करारनाम्यातील कलम २०.३ प्रमाणे ५०:५० या प्रमाणात करावयाचा आहे. ही बाब लक्षात घेता स्वतंत्र अभियंत्याला फेब्रुवारी, २०१२ ते डिसेंबर, २०१३ या कालावधीकरिता उपभोक्ता मूल्य सुचकानुसार वाढीव दराच्या अनुषंगाने रु.९,७१,८१,६३६/- अधिक सेवा कर या वाढीव खर्चापैकी प्राधिकरणावर येणारा खर्च ५०% म्हणजे रु.४,८५,९०,८१८/- इतका असेल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावावर चर्चा करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव १२०८ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प वर्सोवा-अंधेरी-घाटकोपरच्या कामाकरीता नेमणूक केलेल्या स्वतंत्र अभियंत्यास फेब्रुवारी, २०१२ ते डिसेंबर, २०१३ पर्यंतच्या कालावधीकरिता वाढीव दराच्या अनुषंगाने रु.९,७१,८१,६३६/- अधिक सेवा कर या वाढीव खर्चास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

...३३/-

**पटल बाब क्र. २ :** **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रिस्क ॲन्ड कॉस्ट निविदेव्दारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिटी नदीच्या माहिम कॉजवे ते धारावी पूलापर्यंत (सा.क्र.०.००मी. ते सा.क्र.१२८०मी.) मधील पात्राची रुंदी व खोली वाढविण्याचे काम (उर्वरित काम)**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर काम प्रथमतः मे. बी.पी.एल-बी.बी.सी. (जे.व्ही.) या कंत्राटदाराला एप्रिल, २००७ मध्ये देण्यात आले होते. तथापि, एकवेळ मुदतवाढ देण्यात आली व परत मुदतवाढ देवून सुध्दा कंत्राटदाराने ०१ जुलै, २०१० पर्यंत २०% इतकेच काम पूर्ण केले. त्यामुळे सदर काम Foreclose करुन उर्वरित काम सदर कंत्राटदाराच्या risk and cost वर दुस-या कंत्राटदाराकडून करण्याचा निर्णय घेण्यात आला. रु. ४३.०५ कोटी अंदाजाच्या निविदेसाठी विहित कालावधीत एकूण ६ प्रस्ताव प्राप्त झाले, त्यापैकी ३ अपात्र झाले व उर्वरित ३ पैकी मे. आर.ई.इन्फ्रा प्रा.लि. यांचा अंदाजित रक्कमेपेक्षा २९.५९% कमी देकार लघुत्तम व संवादी असल्यामुळे सदर देकार मंजुरीसाठी कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी हि अल्प दराची निविदा असल्याने सदर काम करताना quality audit करुन विशेष देखरेख ठेवण्याचे सुचित केले. तसेच सदरचे काम खोलीकरणाचे असल्याने याआधीच पूर्ण होणे गरजेचे होते. याबाबत लक्ष वेधले म्हणून सदरचे काम विहित कालावधीत पूर्ण करण्याबाबत सुचित केले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १२०९ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली

...३४/-

(माहिम-कॉजवे ते धारावी पूलापर्यंत) वाढविण्याच्या कामांसाठी खालील तक्त्यानुसार कामाच्या लघुत्तम निविदा स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीं व शर्तीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लघुत्तम निविदाकाराचे नाव | लघुत्तम निविदेची टक्केवारी व रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | रिस्क ॲन्ड कॉस्ट निविदेव्दारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या माहिम कॉजवे ते धारावी पूलापर्यंत (सा.क्र.०.०० मी. ते १२८० मी.) मधील पात्राची रुंदी व खोली वाढविण्याचे काम (उर्वरित काम) (रु.४३०५.०० लाख) | मे. आर.ई.इन्फ्रा प्रा.लि. | (-) २९.५९% कमी दराने ३०,३१,५०,०७५/- |

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले इतर विषय :**

श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी त्यांच्या दिनांक ९ जुलै, २०१२ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना अशी विनंती केली की, त्यांनी त्यांच्या पत्रासोबत प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे कामकाजाबाबत मुद्देसुद टिप्पणी सादर केली आहे त्यावर आजच्या (२३४ व्या) बैठकीत किंवा कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत चर्चा करण्यात यावी. वेळेअभावी मा.मुख्य सचिव यांनी असे निर्देश दिले की, या टिप्पणीवर आगामी बैठकीत विचार विमर्श करण्यात येईल.

त्यानंतर मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**************